नियमीत फौ. ख. क्र. ८६/२०२५
सरकार -वि.- अभय व इतर
नि.क्र. २१.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - नितेश दशरथ भोगे,
वय ३४ वर्षे, व्यवसाय – शेती,
राहणार – कारगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत</u>**

१. दिनांक ०५.०४.२०२५ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला होता. आता मला दाखविलेला नि.क्र.१९ वरील समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. पोलिसांनी त्यानंतर कारगाव शिवारात गेलो. तेथे एक टिप्पर ज्यामध्ये रेती होती तो जप्त केला व तसा पंचनामा तयार केला. आता मला नि.क्र.२० वरील घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्त केलेल्या टिप्परचा नंबर मी सांगू शकत नाही. मी आरोपींना ओळखतो. ते आज कोर्टात हजर नाही.
सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायत सदस्य आहे. मी केवळ दोन सह्या केल्या होत्या. मी पोलीस स्टेशनला एकही सही केली नव्हती. पोलिसांनी सुचनापत्र मला घटनास्थळी दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी टिप्पर थांबविलेला होता तेथे आम्हाला समन्स दिला व पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मोजमाप माझ्या समक्ष केले नव्हते.

हे मी सांगू शकत नाही की, टिप्परच्या चालकाने कागदपत्र पोलिसांना दाखविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला पंचनाम्यास सही करण्यास सांगितले म्हणून मी सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी पंचनाम्यात काय लिहीले आहे ते आता मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे पंचनामा कसला होता हे मी ठामपणे सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, देविदास कुरुडकर हे उपसरपंच आहे. हे म्हणणे खरे आहे की, उपसरपंच या नात्याने त्यांचा पोलिसांनी संपर्क येतो. हे म्हणणे खरे आहे की, देविदास यांनी मला सही करण्यास चलं म्हणून सांगितले म्हणून मी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम वाचून पाहिला नव्हता, त्यामुळे त्यात काय लिहीले आहे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा केला नाही, पोलिसांनी सही करण्यास सांगितले म्हणून मी सही केली.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक – २७.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.